**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १७५ वा | गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR





## संपादकीय

# कॉपी रोखण्यात दरवेळी अपयश का येते?

अनेक उपाययोजना करूनही कॉपीची समस्या सुटलेली नाही. शिक्षकांच्या अखत्यारीतील बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित आली, मात्र समस्येची तीव्रता कायम आहे. परीक्षा ऑनलाईन घ्या किंवा ऑफलाईन विद्यार्थ्यांनी त्यात अनेक पळवाटा शोधून काढल्या आहेत.

कॉपीची ही वाळवी हळूहळू संपूर्ण समाजजीवन पोखरेल याचीच भीती वाटत आहे. अनेक शैक्षणिक संस्थांत परीक्षा योग्य पद्धतीने घेतल्या जातात म्हणून मूल्यमापन शब्द अजूनही अस्तित्वात आहे. सगळेच काही भ्रष्ट परीक्षेतून श्रेष्ठ झाले नाहीत. अभ्यासाने, परीक्षेने अनेक जण मोठे यश प्राप्त करू शकले व यशस्वी जीवन जगले. कॉपी न केलेले अनेक जण आपल्या ज्ञानाच्या आधारे जीवनातले अनेक प्रश्न सहजपणे सोडवतात. आज अध्ययन–अध्यापन यापेक्षाही गंभीर प्रश्न परीक्षा व मूल्यमापनासंदर्भात निर्माण होत आहेत.

मूल्यमापनाची विश्वासर्हता कमी होत चालली आहे. त्यासाठी नवीन आराखडा तयार करावा लागेल. फेरमूल्यांकनाची मागणी वाढतेच आहे. कागदावरच्या अध्यापनाची परीक्षा कागदावरच होत आहे. पण कौशल्ये कागदावर पडताळून पाहता येत नाहीत. लिहून दिलेल्या नोट्स नीट परीक्षेत लिहिल्या जात आहेत. मापन म्हणजे एखाद्या गोष्टीचे संख्यात्मक प्रमाण ठरविणे होय. व्यक्तीच्या संदर्भात मूल्यनिर्धारण व प्रकल्प कार्यक्रम किंवा अभ्यासक्रमासंदर्भात मूल्यमापन या संज्ञा वापरल्या जातात. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा समावेश होणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण हे मानवाने संपादन केलेले एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, त्याच्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक प्रकारचे बदल घडवून आणता येतात, हे बदल अपेक्षित दिशेने आणि किती झाले आहेत ते मूल्य निर्धारण मूळे कळते. मूल्यमापन किंवा मूल्यनिर्धारण हे साधन आहे साध्य नव्हे. मूल्यनिर्धारण हे केवळ संपादनाशी संबंधित नाही, तर सुधारणेशीही निगडित आहे. मूल्यनिर्धारणात निर्णयाची गुणात्मक चिकित्साही असते. मापनात केवळ मोजमाप येते. मूल्यनिर्धारणात प्रक्रियेचे परिणाम तपासले जातात पुरावे गोळा करून त्याचा अर्थ लावला जातो.

सतत होणाऱ्या परीक्षा व त्यांची संख्या, त्यांचा निकाल लावणे ही व्यवस्थापनाच्या दृष्टीने समस्या ठरत आहे. करोनाच्या दोन वर्षांत शिक्षण, अध्यापन, संवाद, कौशल्य प्रक्रिया याला एक प्रकारचा सेटबॅक मिळाला. शारीरिक हालचाली सीमित झाल्या. अनेक गोष्टी विस्मरणात गेल्या. ते मूळ पदावर आणणे गरजेचे आहे. आज पूर्वीपेक्षा परीक्षांची संख्या वाढली आहे. सत्र परीक्षा काही विद्यापीठांत यशस्वी झाली नाही किंवा वारंवार परीक्षेमुळे काही ठिकाणी ती योग्य प्रकारे हाताळता आली नाही. आपली पारंपारिक परीक्षा पद्धतीही विषयाच्या माहितीवरच अधिक भर देते. त्यामुळे अनेकांना कौशल्यअपंगत्व आले आहे. अलीकडे प्रश्नपत्रिकाच काय पाठ्यपुस्तकांतही सदोष असतात. मूल्यमापन लेखी परीक्षा पुरतेच मर्यादित असते त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विकासाच्या विविध पैलूंचे मूल्यमापन परीक्षा पद्धतीत होत नाही, परिणामी परीक्षा विश्वसनीय राहिलेल्या नाहीत. विद्यार्थ्यांच्या उणिवांची चिकित्सा करून त्या दूर करण्याचे प्रयत्न वाढीला लावणे ही गोष्ट परीक्षा पद्धतीतून होऊ शकत नाही. शाळेत सुप्त गुण ओळखून त्यांना विकसित करणारी यंत्रणाच नाही. शाळेला फाटा देऊन अशा अनेकांनी आपले सुप्त गुण विकसित केले आहेत.

अजून एटीकेटीची मलमपट्टी वापरली जाते आहेच. परीक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थी कसे उत्तीर्ण होतील व त्यांना ग्रेस मार्क देऊन उतीर्ण कसे करता येईल यावरच लक्ष केंद्रीत झालेले असते. कॉपी करून उत्तर लिहिलेले आहे हे परीक्षकाला समजत असूनही कोणताच पुरावा नसल्यामुळे गुण देऊन मोकळे होण्याशिवाय पर्याय नसतो. परीक्षेच्या काळात कॉपी पुरवणारी एक जमात सज्ज असते. शाळेच्या कंपाउंड वॉलवरून, खिडकीवर चढून ही टोळी युद्धपातळीवर काम करते. भरारी पथक येते व पोत्यांनी कॉपीच्या चिठ्ठ्या गोळा करते पण तरीही कॉपी विद्यार्थ्यांकडे असतेच. परीक्षा केंद्रांच्या स्वच्छतागृहात एक पर्यवेक्षक नेमण्याइतपत विद्यार्थ्यांची कॉपी करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. अध्यापनच झाले नाही तरी पेपरफुटीच्या जोरावर अनेक जण स्वतः शर्यतीत पुढे जातात. सामान्य विद्यार्थी हिरमुसला होऊन तोही त्या कळपात सामील होतो.

विद्यापीठ अनुदान आयोगाने १९७३ मध्ये पदवी परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी कृती योजना प्रसिद्ध केली होती, त्यात विद्यार्थ्यांला अभ्यासाच्या योग्य सवयी लावून घेण्यास उत्तेजना मिळण्यासाठी अंतर्गत मूल्य निर्धारण होते. या पद्धतीमुळे अन्य कौशल्य व उद्दिष्टे यांची तपासणी करता येते. सांख्यिकी विश्लेषणातून असे आढळून आले की जेव्हा परीक्षक उत्तरपत्रिका तपासतो तेव्हा गुणदान करतांना पाच टक्क्यांपेक्षा अधिक गुण देण्याची शक्यता ५० टक्के एवढी असते. विद्यार्थ्यांला त्याची परीक्षा कशी घेतली जाणार आहे हे कळले पाहिजे, त्यासाठी प्रश्नपेढी आवश्यक आहे. प्रश्न रचनेची समस्या व्यवस्थित विकसित केलेल्या प्रश्नपेढी मुळे सुटू शकेल. चांगली शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या ज्ञानात्मक, भावनात्मक व क्रियात्मक बाजूवर सारखेच भर देत असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यापक मूल्यमापनाची संकल्पना स्वीकारणे गरजेचे आहे. अभ्यासाबरोबरच जीवनाच्या अनेक क्षेत्रांत सहभागी होण्यासाठीची काळजी सहशालेय कार्यक्रमातून घ्यायला हवी विशिष्ट ज्ञान क्षेत्रे व त्यातील ज्ञानाचा काही अंश केवळ पाठ्यपुस्तक या पुस्तकाच्या माध्यमातून शिक्षणात विचारात घेतला जातो.

जे जे परीक्षेला येणार त्याचाच अभ्यास करण्याची वृत्ती सध्या दिसते आहे. प्रश्नपत्रिका, प्रश्न चुकीचे असतील तर ज्ञानाच्या कक्षा रुंदावतील कशा? ५० टक्के प्रश्न उपयोजनावर हवेत, तसे प्रयत्न काही विद्यापीठांनी सुरू केले आहेत. केवळ अभ्यासक्रम सर्वसमावेशक असून चालणार नाही परीक्षेतील प्रश्न ही सर्वसमावेशक असावेत. मागच्या प्रश्नांची पुनरावृत्ती किती दिवस करणार? परीक्षेतील त्रुटी या शिक्षण पद्धतीच्या त्रुटी आहेत. परीक्षा म्हणजे केवळ घोका व ओका यापुढे जाऊन पहा व लिहा या अवस्थेत आल्या आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षा यंत्रणेला गुंडाळून ठेवले आहे. कॉपी नियंत्रणासाठी काही ठोस निर्णय दरवर्षी जाहीर होतात पण ते पुरेसे नाहीत.

कॉपी करताच नाही आली किंवा कॉपी करता येत नाही अशी परिस्थिती जेव्हा निर्माण होईल तेव्हाच विद्यार्थी अभ्यासाकडे वळतील. विद्यार्थी व पालकांचे मेळावे, उद्बोधन व्हायला हवे. विद्यार्थी निवड, शिक्षक निवड प्रक्रिया, अभ्यासक्रम व अंमलबजावणी याचा संबंध कॉपी प्रकरणात कुठे आहे याचा शोध घ्यायला हवा. कृती पत्रिकेचा वापर, स्वमत, अभिव्यक्ति, उपयोजनावर भर देणारे प्रश्न असावेत. पेपर काढणारे व तपासणारे यांच्या क्षमतेचा व निकषांचा विचार व्हायला हवा.

परिक्षकांना 'मॅनेज' करणे आता कमी झाले असले तरीही व्हिडीओ शूटिंग, शाळेची मान्यता रद्द करणे याही गोष्टी राबविल्या जात आहेत, तरीही कॉपीची समस्या राहणारच असेल तर कुठेतरी शिक्षणातले मूल्य हरवले आहे याचा गांभीर्याने विचार करायला हवा. सारे काही आहे, पण मूल्यशिक्षण नाही ही आजच्या समाजाची शोकांतिका आहे. काही लढे आपापल्यापरीनेच लढावे लागतात त्यापैकीच शिक्षण आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी करून कॉपी आहेत की नाही पाहण्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर काय परिणाम होत असेल. शिक्षकावर तपासण्याची जबाबदारी असल्यामुळे त्यांच्या अस्तित्वावरही टांगती तलवार असतेच. फोटोकॉपीची दुकाने बंद करणे वगैरे तात्पुरत्या मलमपट्टीच्या योजना आहेत आणि त्या अजिबात परिणामकारक नाहीत. विद्यार्थी फक्त परीक्षेला सामोरे जातात, परीक्षा झाल्यावर माज्यातील कौशल्याचा कस लागला पाहिजे हे त्यांच्या गावीही नसते. केवळ परीक्षा नव्हे तर वर्ग प्रकल्पांतूनच त्यांचे मूल्यनिर्धारण होऊ शकते आणि व्यक्तिमत्व विकास साधला जाऊ शकतो.

# अपघात की घातपात?



अपघात की घातपात? चौकशी का कोणी रोखली? सत्य बाहेर येणं अत्यावश्यक...! राज्यातील राजकारणाला हादरवून सोडणाऱ्या अजित पवार यांच्या विमान अपघाताला पंधरा दिवस उलटले असतानाही प्रश्नच अधिक वाढताना दिसत आहेत. आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन अपघाताबाबत उपस्थित केलेले मुद्दे आणि विशेषतः 'युरोपीय संस्थेकडे जाणारी चौकशी एका मोठ्या नेत्याने रोखली' हा आरोप अत्यंत गंभीर आहे. हा केवळ राजकीय आरोप म्हणून बाजूला सारण्याचा विषय नाही; तर लोकशाही व्यवस्थेतील पारदर्शकतेच्या कसोटीवर तपासला जाण्याचा मुद्दा आहे.

विमान अपघात हा स्वभावतः तांत्रिक, हवामानाशी संबंधित किंवा मानवी त्रुटीमुळे घडणारा प्रकार असू शकतो. मात्र जेव्हा नियोजित पायलट बदलणे, विमान बदलणे, वेळ बदलणे, कंपनीच्या विश्वसनीयतेवर प्रश्न, आणि चौकशी प्रक्रियेत हस्तक्षेपाचे आरोप असे अनेक धागे एकत्र येतात, तेव्हा संशयाचे ढग दाट होणे स्वाभाविक ठरते.

रोहित पवार यांनी मांडलेला मुख्य मुद्दा म्हणजे चौकशीची व्याप्ती आणि तिची निष्पक्षता. राज्य सीआयडीपुरती मर्यादित चौकशी पुरेशी आहे का, की नागरी उड्डाण महासंचालनालय (DGCA) आणि परदेशातील अनुभवी संस्थांची मदत घ्यावी? हा प्रश्न रास्त आहे. विशेषतः जेव्हा संबंधित विमान कंपनीवर परदेशात निर्बंध असल्याच्या चर्चा आहेत, तेव्हा स्वतंत्र आणि तटस्थ चौकशीची मागणी लोकशाहीत गैर ठरत नाही.

परंतु चौकशी पूर्ण होण्यापूर्वी 'घातपात' असा निष्कर्ष जाहीरपणे मांडणे हेही तितकेच धोकादायक आहे. राजकीय वातावरण तापलेले असताना आरोपांची धार अधिक तीव्र होते; पण सत्य हे भावनांवर नव्हे, तर पुराव्यांवर उभे असते. त्यामुळे एकीकडे गंभीर आरोप होत असताना, दुसरीकडे संयमाची भूमिका मांडणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधानही तितकेच महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारने चौकशी समिती नेमल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. मग प्रश्न उरतो तो पारदर्शकतेचा.

जर खरोखरच परदेशी संस्थेकडे चौकशी देण्याचा प्रस्ताव होता आणि तो रोखला गेला असेल, तर कोणत्या स्तरावर, कोणत्या कारणाने आणि कोणत्या प्रक्रियेत तो निर्णय झाला? हे स्पष्ट व्हायला हवे. कारण चौकशी प्रक्रियेवरच शंका निर्माण झाली तर निष्कर्ष कितीही तांत्रिक असले तरी जनमानसात त्याची विश्वसनीयता राहणार नाही.


या प्रकरणात दोन टोकांच्या भूमिका दिसतात—एकीकडे घातपाताचा थेट आरोप, तर दुसरीकडे आरोपांना तथ्यहीन म्हणत पूर्ण नाकारण्याची भूमिका. दोन्ही टोकं धोकादायक आहेत. लोकशाहीला आवश्यक आहे ती स्वतंत्र, वेळबद्ध आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाची चौकशी.

अजित पवार हे वरिष्ठ नेते होते. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी आणि भावनिक वातावरण यामुळे या प्रकरणाला संवेदनशीलतेची किनार आहे. पण भावनांपेक्षा सत्य अधिक महत्त्वाचे आहे. जर अपघात असेल, तर त्यामागील तांत्रिक कारणे स्पष्ट झाली पाहिजेत. जर निष्काळजीपणा असेल, तर जबाबदारांवर कारवाई झाली पाहिजे. आणि जर घातपाताचा पुरावा असेल, तर तो कितीही मोठ्या व्यक्तीपर्यंत पोहोचत असला तरी उघड झाला पाहिजे.

राजकारणात आरोप–प्रत्यारोप सुरूच राहतील. पण या प्रकरणात अंतिम शब्द हा राजकीय व्यासपीठावर नव्हे, तर पारदर्शक आणि वैज्ञानिक चौकशीच्या अहवालातच असला पाहिजे. कारण प्रश्न केवळ एका नेत्याच्या मृत्यूचा नाही; तर व्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासाचा आहे.

सत्य दडपून ठेवले गेले, अशी भावना निर्माण झाली तर त्याचे परिणाम दूरगामी असतात. त्यामुळे आता गरज आहे ती राजकीय आवाज कमी करून चौकशीची गती वाढवण्याची. सत्य जितक्या लवकर आणि स्पष्टपणे समोर येईल, तितके राज्याच्या लोकशाही आरोग्यासाठी हितावह ठरेल.

# श्री गुरु तेग बहादुर यांचे जीवन धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता आणि परोपकार यांचे प्रतीक...



श्री गुरु तेग बहादुर हे शीख परंपरेतील नववे गुरु असून त्यांचे जीवनकार्य मानवतेच्या इतिहासातील एक अद्वितीय अध्याय मानले जाते. 1621 साली अमृतसर येथे गुरु हरगोबिंद यांच्या घरात त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांना शौर्य, साधना आणि अध्यात्म यांची शिकवण मिळाली. युद्धकौशल्यामुळे त्यांना "तेग" म्हणजे तलवार हे नाव लाभले, परंतु त्यांच्या आयुष्याचा खरा गाभा होता अध्यात्मिक साधना आणि मानवतेची सेवा.

गुरु तेग बहादुर यांनी लोकांना सांसारिक मोहातून मुक्त होऊन ईश्वरभक्ती, सत्य आणि करुणा यांचा मार्ग दाखवला. त्यांनी अनेक भजने व श्लोक रचले, जे आज गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांच्या शिकवणीत धैर्य, संयम, परोपकार आणि ईश्वरनिष्ठा यांना विशेष महत्त्व आहे. त्यांनी लोकांना भीतीमुक्त जीवन जगण्याचे आवाहन केले आणि प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्याचा अधिकार आहे हे अधोरेखित केले. त्यांचे सामाजिक कार्यही तितकेच महत्त्वाचे होते. समाजातील दुर्बल, पीडित आणि शोषित घटकांना त्यांनी आधार दिला. धर्मस्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी त्यांनी स्वतःचे बलिदान दिले. "इतरांचा धर्म जपणे म्हणजेच खऱ्या अर्थाने मानवतेची सेवा" हा त्यांचा संदेश होता. 1675 मध्ये काश्मिरी पंडितांनी धर्मांतराच्या भीतीने गुरु तेग बहादुर यांच्याकडे मदत मागितली. त्यांनी स्वतःचे बलिदान देऊन धर्मस्वातंत्र्याचे रक्षण केले. दिल्लीतील चांदणी चौकात त्यांना शहीद करण्यात आले. त्यांच्या शहादतीमुळे भारतात धार्मिक सहिष्णुतेचा दीप प्रज्वलित झाला आणि त्यांना "हिंद की चादर" हे गौरवपूर्ण बिरुद मिळाले.

गुरु तेग बहादुर यांचे जीवन हे धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता आणि परोपकार यांचे प्रतीक आहे. त्यांनी दाखवून दिले की इतरांचा धर्म जपणे म्हणजेच मानवतेचे रक्षण करणे. त्यांच्या शिकवणीतून आजही समाजात एकता, बंधुता आणि न्याय यांचे मूल्य जिवंत आहे. त्यांच्या बलिदानाने भारतीय समाजाला धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व समजले आणि प्रत्येक धमार्ला आपली ओळख जपण्याचा अधिकार आहे हे अधोरेखित झाले.

खारघर, मुंबई येथे 28 फेब्रुवारी व 1 मार्च 2026 रोजी होणारा 350 वा शहीदी समागम हा त्यांच्या शिकवणीचा पुनःस्मरण करून देणारा प्रसंग आहे. या कार्यक्रमातून समाजात सहिष्णुता, परस्पर आदर आणि मानवतेचे मूल्य अधिक दृढ होईल. गुरु तेग बहादुर यांचे जीवनकार्य हे केवळ शीख परंपरेपुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या शहादतीतून आपण शिकतो की सत्य, न्याय आणि धर्मस्वातंत्र्य यासाठी दिलेले बलिदान कधीही व्यर्थ जात नाही. त्यांचे जीवन आणि कार्य हे आजच्या काळातही तितकेच महत्त्वाचे आहे. समाजात वाढत्या असहिष्णुतेच्या वातावरणात गुरु तेग बहादुर यांचा संदेश आपल्याला एकतेकडे, परस्पर आदराकडे आणि मानवतेच्या मार्गाकडे नेतो. त्यांच्या शिकवणीमुळे आपण सर्व धर्मांचा सन्मान करणे, दुर्बलांना आधार देणे आणि सत्यासाठी उभे राहणे हेच खरे मानवतेचे कार्य आहे हे लक्षात ठेवतो.

श्री गुरु तेग बहादुर यांचे जीवनकार्य आणि शहादत ही भारतीय इतिहासातील एक अमूल्य परंपरा आहे. त्यांच्या बलिदानाचा स्मरणोत्सव म्हणजे केवळ धार्मिक कार्यक्रम नसून मानवतेच्या सार्वत्रिक मूल्यांचा उत्सव आहे. खारघर येथे होणारा हा समागम समाजाला पुन्हा एकदा त्यांच्या शिकवणीची आठवण करून देईल आणि भावी पिढ्यांना सत्य, न्याय आणि धर्मस्वातंत्र्य यासाठी उभे राहण्याची प्रेरणा देईल.

**जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर.**

# सोलापूरात स्व. अजितदादा पवार यांचे भव्य व प्रेरणादायी स्मारक उभारावे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृती जतन करण्यासाठी व त्यांच्या विकासात्मक कायार्ला कायमस्वरूपी अभिवादन करण्याच्या उद्देशाने सोलापूर शहरात भव्य व प्रेरणादायी स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभाग आणि रयत क्रांती शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात महापौरांना सविस्तर निवेदन देण्यात आले.



सुरूवातीला महापौर विनायक कोंड्याल यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभाग आणि रयत क्रांती शेतकरी संघटनेच्या पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तदनंतर ही निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभागाचे शहराध्यक्ष वैभव गंगणे व रयत क्रांती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले की, स्व. अजितदादा पवार यांनी आपल्या कारकिर्दीत राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस व दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतले. विशेषतः जलसिंचन प्रकल्प, शेतकरी कर्जमाफी, पायाभूत सुविधा विकास, ग्रामीण भागातील रस्ते व वीजपुरवठा सुधारणा, औद्योगिक गुंतवणूक वाढविणे आणि युवकांसाठी रोजगार निर्मिती या क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले. सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठीही त्यांनी वेळोवेळी निधी उपलब्ध करून देत विविध प्रकल्पांना गती दिली होती.

स्व. अजितदादांचे नेतृत्व, प्रशासनिक पकड आणि कार्यतत्परता यामुळे ते सर्वसामान्यांच्या मनात लोकप्रिय नेते म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या अचानक झालेल्या निधनामुळे राज्यासह सोलापूर जिल्ह्यावर शोककळा पसरली होती. आजही नागरिकांमध्ये त्यांच्या स्मृतींविषयी प्रचंड आदर व भावनिक जिव्हाळा आहे. हीच जनभावना लक्षात घेऊन सोलापूर शहरातील मध्यवर्ती व प्रतिष्ठित ठिकाणी त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासह सुशोभित स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

तसेच, स्मारक परिसरात त्यांच्या जीवनकार्याचे दस्तऐवजीकरण, छायाचित्र दालन, ग्रंथालय किंवा अभ्यासिका उभारण्यात यावी, जेणेकरून युवकांना त्यांच्या कायार्चा प्रेरणादायी वारसा समजेल, असा प्रस्तावही मांडण्यात आला. सोलापूर महानगरपालिकेने याबाबत ठराव मंजूर करून राज्य शासनाकडे तात्काळ प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. 'अजितदादा हे फक्त नेते नव्हते, तर विकासाची दिशा दाखवणारे नेतृत्व होते. त्यांचे स्मारक हे सोलापूरच्या विकास इतिहासातील एक अभिमानाचे प्रतीक ठरेल,' अशी भावना व्यक्त करण्यात आली.

महापौरांनी निवेदन स्वीकारून विषय गांभीर्याने विचारात घेतला जाईल व सकारात्मक पावले उचलली जातील, असे आश्वासन दिल्याची माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली.

या निवेदनावर महापौर विनायक कोंड्याल यांनी सकारात्मक प्रतिसाद देत येणाऱ्या काळात निश्चितच स्व. अजित दादा पवार यांचे भव्य स्मारक उभारण्यात येईल असे आश्वासन यावेळी दिले.

यावेळी सुहास कोलारकर, रेवप्पा सुतार, पवन पाटील ,सागर रणदिवे, धनंजय शिंदे, विकास शिंदे, श्रीनिवास यादगिरी, संतोष माने, संदेश मुळावकर, सौरभ काटकर यांची उपस्थिती होती.

# कामतीत विकासाला गती देण्याचे पालकमंत्र्यांचे आश्वासन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत कामठी जिल्हा परिषद गटातून विमलताई खताळ तसेच कामती पंचायत समिती गणातून सौ. कोमलताई अंकुश आवताडे यांनी दणदणीत विजय मिळवल्यानंतर त्यांच्या सत्कारासाठी भव्य समारंभाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमात पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांच्या हस्ते नूतन पंचायत समिती सदस्य कोमलताई आवताडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना गोरे म्हणाले की, कामती पंचायत समिती गणासाठी विकास निधी कधीही कमी पडू देणार नाही. जनतेने दिलेल्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी सर्व विकासकामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पूर्ण केली जातील.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य विमलताई खताळ, अंकुश भैय्या आवताडे, अक्षय दादा खताळ, पोखरापूर पंचायत समिती सदस्य संजीव दादा खिलारे, मोहोळचे नगरसेवक सुशील भैया क्षीरसागर, लहू आवताडे तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडून आलेल्या प्रतिनिधींनी हा विजय वैयक्तिक नसून जनतेच्या विश्वासाचा असल्याचे सांगत पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि इतर मूलभूत सुविधांसाठी प्राधान्याने काम करण्याचे आश्वासन दिले. हा सत्कार समारंभ कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करणारा ठरला असून भविष्यातील विकासकामांना नवी ऊर्जा मिळाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# राज्यात शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी टास्क फोर्स; शासनाचा महत्त्वाचा निर्णय

**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** राज्यात वाढत्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना सर्वंकष मदत देण्यासाठी विशेष टास्क फोर्स स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदभार्तील परिपत्रक कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी जारी केले आहे.

या टास्क फोर्सच्या अध्यक्षपदी विस्तार व प्रशिक्षण विभागाचे संचालक रफिक नाईकवाडी यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबतच शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर काम करणाऱ्या तज्ज्ञांचाही समावेश करण्यात आला आहे.



या कृती दलाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना आपत्तीपूर्व, आपत्तीच्या काळात आणि आपत्तीनंतर शेती, आर्थिक, सामाजिक व मानसिक अशा चतुःसूत्री दृष्टिकोनातून मदत करणे हा आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे वेगवेगळ्या दृष्टीकोनातून न पाहता एकात्मिक पद्धतीने उपाययोजना करण्यावर भर दिला जाणार आहे. शेतकऱ्यांना नैराश्यातून बाहेर काढणे आणि संकटांना सामोरे जाण्यास सक्षम बनवणे, हा या टास्क फोर्सचा मुख्य उद्देश असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले.

हवामान बदलामुळे वाढणाऱ्या नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान, आर्थिक अडचणी, सामाजिक दबाव आणि मानसिक अस्थैर्य यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडत असल्याचे नमूद करत, त्यांना वेळेत मार्गदर्शन आणि मानसिक आधार देणे अत्यावश्यक असल्याचेही कृषी विभागाने सांगितले आहे.

# पोलिसांना धक्काबुक्की; नागेश ताकमोगेना १ वर्ष सक्तमजुरी; ७५०० रुपयांचा दंड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** पोलिस अधिकाऱ्याशी हुज्जत घालून धक्काबुक्की करत सरकारी कामात अडथळा आणल्याच्या २०१५ मधील प्रकरणात माजी नगरसेवक नागेश ताकमोगे यांना न्यायालयाने दोषी ठरवत १ वर्ष सक्तमजुरी आणि ७ हजार ५०० रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जे. जे. मोहिते यांनी हा निकाल दिला.

७ फेब्रुवारी २०१५ रोजी तत्कालीन सहाय्यक पोलिस आयुक्त महिपती इंदलकर हे कर्मचारी वर्गासह आसरा चौक परिसरात कर्तव्य बजावत होते. यावेळी वाळूने भरलेल्या एका टिप्परमुळे वाहतुकीची कोंडी झाली होती. पोलिसांनी टिप्पर चालकाकडे आवश्यक कागदपत्रांची मागणी केली असता ती उपलब्ध नसल्याचे लक्षात आले. त्यामुळे संबंधित वाहन विजापूर नाका पोलिस ठाण्यात जमा करण्यास सांगण्यात आले.

याच वेळी आरोपी नागेश ताकमोगे १० ते १५ जणांसह घटनास्थळी दाखल झाले. ह्हा ट्रक माझा आहे, तो पोलिस स्टेशनला नेऊ देणार नाही,ह्व असे म्हणत त्यांनी पोलिसांशी वाद घातला. त्यानंतर आरोपीने अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत पोलिस अधिकाऱ्यांना धक्काबुक्की केली. तसेच रस्त्यावर उभ्या इतर वाहनांच्या चाव्या काढून घेऊन रस्ता जाम करण्याचा प्रयत्न केला आणि पोलिसांना धमकावून त्यांच्या कामात अडथळा आणला. या घटनेनंतर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे ॲड. दत्तुसिंग पवार आणि ॲड. शैलजा क्यातम यांनी काम पाहिले. न्यायालयात एकूण ११ साक्षीदारांची तपासणी करण्यात आली. सादर केलेले पुरावे आणि युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३ अंतर्गत दोषी ठरवले.

यानुसार आरोपीला १ वर्ष सक्तमजुरी व ७,५०० रुपयांचा दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली. या प्रकरणाचा तपास एपीआय अनिल चौगुले यांनी केला. आरोपीतर्फे ॲड. पी. बी. लोंढे यांनी बाजू मांडली.

या निकालामुळे सरकारी कामात अडथळा आणणाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारला जाईल, असा संदेश दिला गेल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## वात्रटिका


### म्हणे ते परतून येणार

भाबड्या आशेला रोजच
नवे नवे पंख फुटतात...
आणि सोशल मिडियावर
नवे नवे व्हिडीओ पडतात...
कोणी कधी म्हणाले होते
मी पुन्हा येईन, ते वेगळे...
आता आशा धरून बसलेले
की ते पुन्हा येणार हे वेगळे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# माळशिरस : भाजपला १८ हजार मतांची पिछाडी; मोहिते-पाटील गटाची आघाडी कायम






**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत मोहिते-पाटील गटाने आपला गड कायम राखत भाजपला मोठी टक्कर दिली. जिल्हा परिषदेच्या ९ गटांमध्ये मोहिते-पाटील गटाला १ लाख १४ हजार ८५८ मते मिळाली, तर भाजपला ९६ हजार १४० मते मिळाली. त्यामुळे भाजप सुमारे १८ हजार ७१८ मतांनी मागे राहिला आहे. पंचायत समितीच्या १८ गणांमध्येही जवळपास अशीच स्थिती राहिली असून येथेही भाजप सुमारे १८ हजार मतांनी पिछाडीवर राहिला.


या निवडणुकीत चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या. लवंग गणात भाजपचा उमेदवार अवघ्या १९ मतांनी विजयी झाला, तर तांदूळवाडी गणात मोहिते-पाटील गटाचा उमेदवार केवळ ३० मतांनी विजयी झाला. जिल्हा परिषदेत मोहिते-पाटील गटाच्या ९ उमेदवारांनी चार आकडी मताधिक्याने विजय मिळवला, तर भाजपच्या केवळ एका उमेदवाराला मोठ्या फरकाने विजय मिळवता आला. पंचायत समितीत भाजपच्या एकाही उमेदवाराला चार आकडी मताधिक्य मिळाले नाही.

दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी, रिपब्लिकन आदी पक्षांचा पाठिंबा मोहिते-पाटील गटाला असतानाही रामभाऊ सातपुते यांनी एकट्याच्या बळावर मोठ्या प्रमाणात मते मिळवून वेगळी छाप पाडली. निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर पक्षांतर झाल्याने मतदारांनीही त्याचा विचार केल्याचे निकालातून दिसून आले.

पंचायत समितीमध्ये शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) या मित्रपक्षांचे प्रत्येकी दोन उमेदवार मोहिते-पाटील गटाकडून विजयी झाले आहेत. हे उमेदवार भाजपकडे वळवून पंचायत समितीत सत्ता स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. मात्र हे उमेदवार मोहिते-पाटील गटाशी निष्ठावंत असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

रामभाऊ सातपुते यांच्या कामगिरीमुळे तालुक्याच्या राजकारणात नवा ट्रेंड निर्माण झाला आहे. पूर्व भागात मोहिते-पाटील यांचा बालेकिल्ला असला तरी भाजपने लवंग परिसरातून शिरकाव करत अनेक गावांत ५० टक्क्यांपर्यंत मते मिळवली. त्यामुळे दोन्ही गटांना आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नव्या रणनीतीची गरज भासणार आहे. या निवडणुकीत डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांनीही सक्रिय भूमिका बजावली. त्यांच्या पाठिंब्याने अजित पवार गटाचे दोन उमेदवार विजयी झाल्याने मोहिते-पाटील गटात उत्साहाचे वातावरण आहे.

# पंढरपूरमध्ये पाटील-भालके आघाडीला मतदारांचा कौल






**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत ऐनवेळी विठ्ठल परिवारातील नेत्यांना भाजपमध्ये प्रवेश देऊन उमेदवारी देण्याची रणनीती मतदारांना रुचली नसल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. उलट आमदार अभिजित पाटील आणि भगीरथ भालके यांच्या उशिरा झालेल्या आघाडीला मतदानरूपी कौल मिळाल्याने पंढरपूर तालुक्यात भाजप व परिचारक गटाला मोठा धक्का बसला आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाला आत्मचिंतनाची गरज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

२०१७ च्या निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या ७ व पंचायत समितीच्या १४ जागा जिंकून भाजप-परिचारक गटाने सत्ता मिळवली होती. मात्र यंदा त्यांना केवळ तीन जिल्हा परिषद व आठ पंचायत समिती जागांवर समाधान मानावे लागले. हक्काचे मतदारसंघही गमावण्याची वेळ भाजपवर आली. नगराध्यक्ष निवडणुकीतील पराभवानंतर ग्रामीण भागातील या निवडणुकीतही भाजप अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकला नाही.

निवडणुकीपूर्वी विरोधकांत एकवाक्यता नसल्याने भाजपची स्थिती मजबूत दिसत होती. याचा फायदा घेत सहकारशिरोमणीचे अध्यक्ष कल्याणराव काळे, अ‍ॅड. गणेश पाटील तसेच युवराज पाटील यांना भाजपने आपल्या गोटात घेतले. दुसरीकडे मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या प्रयत्नांतून आमदार अभिजित पाटील व भगीरथ भालके यांची ऐनवेळी आघाडी झाली. या आघाडीमुळे तालुक्यातील समीकरणे पूर्णपणे बदलली.

आमदार अभिजित पाटील यांनी वाखरी व भोसे गटांवर विशेष लक्ष केंद्रित केले. परिणामी, भाजपकडून उमेदवारी मिळालेल्या मोनिका काळे व प्रफुल्लता पाटील यांचा पराभव झाला. मात्र कासेगाव गटातून व्यंकट भालके विजयी झाले. पाटील-भालके एकत्र आल्याने तालुक्यातील पाच गट त्यांच्या ताब्यात गेले.

दरम्यान, मंगळवेढा तालुक्यात मात्र भाजपचे आमदार समाधान आवताडे यांनी आपली ताकद कायम राखत जिल्हा परिषदेच्या चारही व पंचायत समितीच्या सहा जागा जिंकल्या. येथे तीर्थक्षेत्र विकास आघाडीला पंचायत समितीच्या दोन जागांवर समाधान मानावे लागले.

या निवडणुकीत भाजपची सर्व सूत्रे माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हाती होती, तर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही सभांद्वारे जोरदार प्रचार केला. तरीही अपेक्षित यश मिळाले नाही. काळे व गणेश पाटील यांच्या भूमिकेला मतदारांनी नकार दिल्याचे चित्र स्पष्ट झाले.

आजूबाजूच्या तालुक्यांत भाजपने मुसंडी मारली असताना पंढरपूरमध्ये मात्र वेगळे चित्र दिसले. पंचायत समितीमध्ये सत्ता स्थापनेदरम्यान पुढील राजकीय घडामोडी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जिल्हा परिषदेत सर्वाधिक जागा जिंकल्याने पाटील-भालके गटाचे मनोबल उंचावले असून पुढील विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने या विजयाकडे पाहिले जात आहे.

# शिवजयंतीनिमित्त 'मंगळवेढा किल्ला' ऐतिहासिक सहल

## छत्रपती शिवाजी महाराजांचा किल्ल्यात होता सात दिवस मुक्काम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरण आणि वारसा संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या इको फ्रेंडली क्लबकडून यंदाची शिवजयंती अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात येणार आहे. ज्या भूमीवर खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांचे वास्तव्य लाभले, त्या ऐतिहासिक मंगळवेढा भुईकोट किल्ला दर्शनासाठी 19 फेब्रुवारी 2026 रोजी एक दिवसीय विशेष सहलीचे आयोजन करण्यात आले आहे.



इतिहासाच्या पाऊलखुणा शोधणाऱ्या शिवभक्तांसाठी ही सहल पर्वणी ठरणार आहे. 1665 च्या विजापूर मोहिमेत महाराजांनी मंगळवेढा किल्ल्यात सात दिवस मुक्काम केला होता. या ऐतिहासिक घटनेची साक्ष देणाऱ्या या किल्ल्याची माहिती नवीन पिढीपर्यंत पोहोचवणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

या 'वन डे टूर'मध्ये पर्यटकांना मंगळवेढा किल्ल्यासोबतच संत दामाजी मंदिर, श्री रिद्धी सिद्धी महागणपती मंदिर, काशीविश्वेश्वर मंदिर, श्री सिद्धेश्वर मंदिर माचणूर या पर्यटन स्थळांनाही भेट देता येणार आहे. अधिक माहितीसाठी 8888856530 किंवा 9021221114 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन इको फ्रेंडली क्लबच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'वाचाल तर वाचाल'चा संदेश देणारा पुरस्कार सोहळा



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** वाचनामुळे स्मरणशक्ती, एकाग्रता आणि बौद्धिक क्षमता वाढते तसेच मानसिक आरोग्य सुधारून व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते. या पार्श्वभूमीवर फॅबटेक टेक्निकल कॅम्पस, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील मध्यवर्ती ग्रंथालय विभागाने चालू शैक्षणिक वर्षापासून सुरू केलेला 'सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापरकर्ता पुरस्कार' हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे मत संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांनी व्यक्त केले.

पुरस्कार वितरण समारंभात बोलताना रूपनर म्हणाले, 'वाचाल तर वाचाल' या उक्तीप्रमाणे जीवनात प्रगती करण्यासाठी आणि विचारांना दिशा देण्यासाठी ग्रंथालयातील उत्तम साहित्याचे वाचन आवश्यक आहे. वाचनातून होणारे संस्कार व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी पदवी व पदविका विभागातून ग्रंथालयातील पुस्तकांचा सर्वाधिक वापर करणारे विद्यार्थी अहमद मुलाणी, सानिका जाधव, अथर्व राजमाने आणि प्रणाली वाघमारे यांना गौरविण्यात आले. तसेच शिक्षकांमधून प्रा. धनश्री राऊत, प्रा. केनचाप्पा दुधाळ, प्रा. गौरी कुलकर्णी आणि प्रा. अजय भोसले यांना 'सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापरकर्ता' पुरस्कार देण्यात आला.

कार्यक्रमाला इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य तानाजी बुरूंगले, प्राचार्य डॉ. संजय बैस, पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य सिकंदर पाटील आदी उपस्थित होते.

# मंद्रप येथील संतोष पाटील महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न



**मंद्रप (कटूसत्य वृत्त):-** अलीकडे फास्ट फूड, बेकरी पदार्थ तसेच रस्त्यावरील गाड्यांवर मिळणाऱ्या चायनीज पदार्थांचे सेवन मोठ्या प्रमाणात वाढले असून त्यामध्ये वापरले जाणारे कृत्रिम रंग व रसायने मानवी आरोग्यास घातक ठरत आहेत. त्यामुळे अशा पदार्थांचा मोह टाळून अन्न भेसळीविषयी जागरूक राहून आरोग्याचे रक्षण करावे, असे आवाहन सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे सहसचिव प्रा. सुबोध कोळी यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील संतोष पाटील महाविद्यालय, अन्न व औषध प्रशासन सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'भेसळयुक्त अन्न कसे ओळखावे?' या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी उमेश भुसे, अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. रामानंद स्वामी, अन्न विश्लेषक श्रीनिवास जाधव, संस्थेचे विश्वस्त नागेश बिराजदार, प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. के. यू. गरड यांनी केले, तर स्वागतपर मनोगत प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी व्यक्त केले. विश्वस्त नागेश बिराजदार यांनी बाजारातून आणला जाणारा भाजीपाला व दैनंदिन वापरातील खाद्यपदार्थ तपासून घेणे आणि आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

अन्न व औषध प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी उमेश भुसे यांनी वाढदिवसाच्या केकमध्ये आकर्षक दिसण्यासाठी मोठ्या प्रमाणात कृत्रिम रंगांचा वापर केला जात असल्याबाबत इशारा दिला. केकमध्ये अशा रंगांचा वापर करण्यास परवानगी नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पिण्याच्या पाण्याचा टीडीएस तपासूनच पाणी वापरावे; फिल्टर पाणी नेहमीच शुद्ध असेलच असे नाही, असेही त्यांनी सांगितले.

याच कार्यक्रमात प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप, प्रा. डॉ. सोनाली रणदिवे व प्रा. डॉ. सविता सातपुते यांनी लिहिलेल्या वनस्पतीशास्त्र विषयावरील अभ्यासक्रम पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रीती बगले हिने केले, तर आभार प्रा. डॉ. बी. एस. कोरे यांनी मानले.

# पाटील प्रशालेच्या मुख्याध्यापक पदी चोपडेंची निवड



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** अनगर येथील कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय अनगर येथील प्राचार्य चंद्रकांत ढोले हे नियत नियमानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या ठिकाणी उपप्राचार्य म्हणून कार्यरत असणारे महादेव चोपडे यांची मुख्याध्यापक तथा ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य पदी निवड करण्यात आली. माधव खरात यांची उपप्राचार्य तर राजेंद्र डोके यांची पर्यवेक्षक पदी निवड झाली. याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या शुभहस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. प्राचार्य चंद्रकांत ढोले यांची श्रीनगर सिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ अनगर या संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यकारी संचालक, नूतन प्राचार्य, उपप्राचार्य व पर्यवेक्षक यांना नवीन जबाबदारी साठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी परमेश्वर थिटे, रमेश चव्हाण, गोरख गायकवाड, उज्वला घोलप, महादेव पवार, शिवाजी थिटे, सोमनाथ गुंड, विलास गुंड, चंद्रकांत सरक, बब्रुवान बोडके, अनुराधा गोडसे, माधवी पाचपुंड, अनुपमा वरवटकर, तात्या गायकवाड, सोमनाथ ढोले, दाजी गुंड, अर्चना गुंड, झाकीर मुलानी, डॉ.प्रशांत कुलकर्णी, अलमास बागवान, बापूराव घुले, गजानन जिरगे, गणेश नकाते आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# शिवजन्मोत्सव पाळणा सोहळा तयारीला वेग

## राष्ट्रमाता जिजाऊंच्या वेशभूषेत सहभागी होणार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** १९ फेब्रुवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर १८ फेब्रुवारीच्या मध्यरात्री पार पडणाऱ्या शिवजन्मोत्सव पाळणा सोहळ्याच्या नियोजनासाठी मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी रोजी डाळिंब आड मैदान येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

आई तू जिजाऊ हो ही यंदाच्या वर्षीची संकल्पना आहे. त्यामुळे पाळणा सोहळ्या राष्ट्रमता जिजाऊंच्या पारंपारिक वेशभूषित सहभागी होण्याचा निर्धार उपस्थित महिलांनी केला.

बैठकीत जिजाऊ पाळणा सोहळ्याचे स्वरूप, कार्यक्रमाची रूपरेषा, शिस्तबद्ध आयोजन, वेळेचे नियोजन तसेच महिलांचा सहभाग याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित महिलांनी यंदाही राष्ट्रमाता जिजाऊंच्या वेशभूषेत सोहळ्यात सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला. प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही हा सोहळा भव्य, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी पद्धतीने पार पाडण्याचा एकमुखी निर्णय बैठकीत घेण्यात आला.

राष्ट्रमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांवर घडवलेले संस्कार, त्याग, मातृत्व आणि राष्ट्रनिष्ठा या मूल्यांचे स्मरण व्हावे, या उद्देशाने हा पाळणा सोहळा साजरा केला जातो. या कार्यक्रमातून महिलांमध्ये सामाजिक भान, राष्ट्रप्रेम आणि सांस्कृतिक जाणीव अधिक दृढ होत असल्याचे मत चंद्रिका चव्हाण, शोभा मोरे, नलिनी जगताप, सुधा अळळीमोरे, प्राध्यापक ज्योती वाघमारे यानी मत व्यक्त केले.

बैठकीदरम्यान महिलांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आपापली जबाबदारी स्वीकारत स्वयंसेवी सहभाग नोंदवला. तसेच पाळणा सोहळ्याच्या वेळी शिस्त, पारंपरिक वातावरण आणि मयार्दांचे पालन करण्यावर विशेष भर देण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही जिजाऊ पाळणा सोहळा भावपूर्ण वातावरणात, पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून, या सोहळ्याच्या माध्यमातून राष्ट्रमाता जिजाऊंच्या कायार्चा व विचारांचा जागर करण्याचा संकल्प महिलांनी केला आहे. यावेळी पाळणा गीताचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

बैठकीचे प्रस्ताविक कार्याध्यक्ष उत्तरा बरडे यांनी तर सूत्र संचालन चारुशीला जगदाळे यांनी केले.

या बैठकीस मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्ट अध्यक्ष पद्माकर काळे, उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, श्रीकांत घाडगे, राजकुमार काकडे, श्रीकांत डांगे, नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांच्यासह संजीवनी मुळे, माजी उपमहापौर सुषमा घाडगे, नीलिमा शितोळे रेखा सलगर, प्रतिभा काळे, तेजा घाडगे, उज्वला साळुंखे, रेश्मा घुले, अर्चना बरडे, सुनंदा साळुंखे,

उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देविदास घुले सचिन स्वामी यांनी परिश्रम घेतले.

### नूतन नगरसेविकांचा सत्कार

उपमहापौरपदी निवड झालेल्या ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, श्रद्धा पवार, मनोरमा सपाटे, मंदाकिनी तोडकरी, अलका भवर, मृण्मयी गवळी, यूपीएससी परीक्षेमध्ये यश मिळवणाऱ्या वैष्णवी गायकवाड यांचा गौरव करण्यात आला.

# शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये 'मी सावित्री होणार गं' कार्यक्रम संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये, मी सावित्री होणार गं! हा महिलांसाठी, हळदी-कुंकवाचा कार्यक्रम रोजच्या कामातून विरंगुळा मिळावा' या उद्देशाने आयोजित केला होता.



शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल आणि चंदुकाका सराफ बारामतीकर शाखा अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती कु.इशिता धैर्यशील मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लाभली. यावेळी शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलचे चेअरमन रामकृष्ण काटकर, जेष्ठ एल एम सी मेंबर एच.डी भोसले उपस्थित होते.

सदर कार्यक्रमासाठी 300 महिलां उपस्थितीत होत्या. यावेळी कार्यक्रमात महिलांसाठी वेगवेगळे मनोरंजक खेळ घेण्यात आले. विशेष म्हणजे प्रत्येक खेळात सर्वच महिला हिरीरीने सहभागी होत होत्या.

कार्यक्रमासाठी निवेदक म्हणून प्रशालेतील शिक्षिका सौ. शिल्पा जाधव आणि तमन्ना नाईकवाडी यांनी काम पाहिले. कार्यक्रम सुरळीत पार पडण्यासाठी सर्व शिक्षक स्टाफ यांचे सहकार्य लाभले तर कार्यक्रमाची रंगत वाढवणारी म्युझिक सिस्टीम प्रशालेतील संगीत शिक्षक गणेश शेवकर यांनी काम पाहिले.

